महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# उपनिबंधक, सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई यांचे कार्यालय

बि.नं.ए-१, रुम.नं.३१५, तिसरा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, आरटीओ जवळ, वडाळा (पू) मुंबई -४०० ०३७.

जा.क्र./उपनि/के-पू.वि/मुंबई/बी-५/ २०६९ /२०२४
दिनांक :- २४/१०/२०२४.

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
जय चेंबर को-ऑप.हौसिंग सोसायटी लि.,
प्लॉट नं.३५७, टीपीएस नं. V, सर्विस रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई -४०० ०५७,

**विषय**:- संस्थेच्या पुर्नविकासाबाबत..

**संदर्भ** - १. शासन निर्णय क्रमांक सगृयो २०१८/प्र.क्र. ८५/१४-स, दिनांक ०४.०७.२०१९.
२. संस्थेकडील दिनांक २७.०९.२०२४ रोजीचे पत्रासोबत या कार्यालयास दिनांक ०७.१०.२०२४ रोजी प्राप्त प्रस्ताव.
३. या कार्यालयाकडील दिनांक ०९.१०.२०२४ रोजीचे पत्र.
४. प्राधिकृत अधिकारी यांचेकडील दिनांक २१.१०.२०२४ रोजीचा अहवाल.
५. संस्थेच्या दिनांक १७.१०.२०२४ रोजीच्या सभेचे इतिवृत्त.

उपरोक्त संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

जय चेंबर को-ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.३५७, टीपीएस नं. V, सर्विस रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई -४०० ०५७, या संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासासाठी विकासक निवडीच्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेसाठी संस्थेने संदर्भ क्रमांक २ अन्वये सादर केलेला प्रस्ताव विचारात घेऊन या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ३ चे पत्रान्वये श्री.अरविंद मनवर - सहायक सहकारी अधिकारी व श्री.अतुल मोरे - सहायक सहकारी अधिकारी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार प्राधिकृत अधिकारी हे संस्थेने दिनांक १७.१०.२०२४ रोजी बोलाविलेल्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित होते.

प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २१.१०.२०२४ रोजीचा अहवाल संदर्भ क्रमांक ४ अन्वये या कार्यालयास सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, संस्थेच्या दिनांक १७.१०.२०२४ रोजीच्या सभेस संस्थेच्या एकूण १० सभासदांपैकी ८ सभासद प्रत्यक्ष उपस्थित होते. सदर

सभेस प्रत्यक्ष उपस्थित सर्व सभासदांनी सर्वानुमते **M/s. Nambiar Realty,** यांची संस्थेचे विकासक म्हणून निवड केली आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास सादर केलेल्या अहवालानुसार संस्थेने पुनर्विकासाबाबत संस्थेच्या एकूण सभासदांच्य ५१ % पेक्षा जास्त सभासदांच्या बहुमताने ठराव मंजूर केलेला असुन मंजूर ठरावानुसार संस्थेने **M/s. Nambiar Realty,** यांची संस्थेचे विकासक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे उपरोक्त नियुक्त विकासकाकडून संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकासाचे काम करुन घेण्यास दिनांक ०४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद अटी व शर्तीस अधिन राहून या कार्यालयाची काहीही हरकत नाही.

**( डॉ.ज्ञानेश्वर डोंगरे )**
**प्रभारी उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई**

**प्रत:-**
**M/s. Nambiar Realty,**

**प्रभारी उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, के-पूर्व विभाग, मुंबई**